# पेट्रोलियम ॲन्ड गैस वर्कस फेडरेशन ऑफ इंडिया

दिनांक 16.08.2017

**मा. श्री प्रदीप मयेकर यांना जागतीक परिषदेस उपस्थित रहाण्यासाठी मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा!**

मित्र हो,

संपूर्ण भारतात 27 हून अधिक असलेल्या पेट्रोलियम कंपन्या या उपरोक्त फेडरेशनशी संलग्न आहेत. ओएनजीसीसह इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम, ऑईल इंडिया, इंडियन ऑईल, हिन्दूस्थान पेट्रोलियम अशा अनेक कंपन्या या फेडरेशनच्या सदस्य असुन या प्रत्येक कंपनीतील संघटनांचे प्रमुख पदाधिकारी या फेडरेशमध्ये विविध पदावर कार्यरत आहेत. मा. श्री प्रदीप मयेकर हे या फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष असुन मा. श्री तपन सेन, मेंबर ऑफ पार्लमेंट हे या फेडरेशनचे सिनीयर व्हाइस प्रेसिडंट आहेत. वरिल सर्व कंपन्यामधील पदाधिकारी हे वर्षातुन साधारणपणे दोनवेळा या फेडरेशनच्या माध्यमातुन एकत्र येऊन कामगार क्षेत्रातील समस्या व कामगार धोरण याच्यावर विचार-विनिमय करीत असतात व त्याचप्रमाणे मा श्री तपन सेन हे मेंबर ऑफ पार्लमेंट असल्यामुळे कामगारांच्या धोरणाबाबत लोकसभेत कामगारांची बाजु मांडत असतात.

उपरोक्त फेडरेशन हे जागतीक फेडरेशनशी संलग्न असुन प्रत्येक वर्षी या फेडरेशनची जागतीक परिषद आयोजीत करण्यात येते. या जागतीक परिषदेसाठी भारतातर्फे प्रतिनिधीत्व करण्यासाठी भारतातील सर्व कंपन्याचे प्रतिनिधी विचार-विनिमय करुन जागतीक परिषदेसाठीच्या प्रतिनिधीची निवड करित असतात. यापूर्वी या फेडरेशनच्या झालेल्या जागतीक परिषदेत मा श्री प्रदीप मयेकर यांची सर्वानुमते एकमताने निवड झालेली असुन तेंव्हा त्यांनी अथेन्स (ग्रीस) इजिप्त, फ्रान्स, वेनेझुएला (अमेरिका) व इराण येथे भारता तर्फे जागतीक परिषदेत प्रतिनिधीत्व केलेले आहे.

ऑगस्ट, 2017 मध्ये ब्राझील येथे सदर फेडरेशनची जागतीक परिषद असुन मा श्री प्रदीप मयेकर यांची यावेळी देखील भारतातर्फे प्रतिनिधीत्व करण्यासाठी एकमताने निवड झालेली असुन हि संपूर्ण ओएनजीसीतील कामगारांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. तसेच मॅनेजमेंटच्या दृष्टीने देखील विशेष दखल घेण्याजोगी बाब आहे कर्मचारी संघटना तसेच ओएनजीसीतील तमाम कर्मचाऱ्यांतर्फे मा श्री प्रदीप मयेकर यांना या जागतीक परिषेदेस उपस्थित रहाण्यासाठी मन:पूर्वक हार्दीक शुभेच्छा!

**(प्रकाश दळवी)**
अध्यक्ष
ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना